# शिवतीर्थावरून..! भाग ६




*शिवतीर्थ - **निश्चयाचा महामेरू, बहुत जनांशी आधारू. अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी.** - समर्थ रामदास स्वामी.*

## मुंबईत निराधारांना जीवनाश्रय देणारा संदीप परब

शिवाजी पार्कला आमची सकाळी फेरी मारतांना पहिल्याच दिवशी देवाप्रमाणे हमखास प्रथम दर्शन झाले ते, सदैव हंसतमुख व आनंदी डॉ. अनिल नेरुरकरचे. मग, मिठ्या वगैरे मारून तब्बेतीची चौकशी व बातचीत करून स्वारी घाईत पुढील मार्ग धरत असे. शिवाय, त्या धांवपळीत माझ्या लेखांचं कौतुक करायाला तो कधीही विसरत नाही. मग, परत कांहीतरी सांगायला विसरला म्हणून तो पाठीमागे फिरला व म्हणाला, *"आज दुपारी तुम्ही दोघं माझ्याकडे जेवायला या. फ्रेश मासे, कोळंबी, नाचणीची भाकरी व व्हेजिटेबल बिर्याणीचा बेत आहे. मी त्याआधी फोन करतो..."* अनिलने प्रेमाने केलेल्या आमंत्रणाचा व आदरातिथ्याचा अनुभव आम्हाला नव्याने नव्हता. तसं पाहिलं तर, अनिल दर तीन महिन्यांनी मुंबईत असतो. म्हणजे, तीन महिने मुंबईत व तीन महिने अमेरिकेत असं त्याचं वेळापत्रक. गोव्यातील स्वतःच्या कुडाळ या गांवात व सिंधुदुर्गात 'सिगारेट ओढू नका व तंबाखू खाऊ नका' हा त्याचा स्वखर्चाने अनेक वर्ष निस्वार्थीपणे चाललेला सामाजिक मोठा प्रकल्प असून महाराष्ट्र व गोवा सरकारने त्याचा जाहीरपणे गुण-गौरवही केला आहे. हे सर्वश्रुत आहे.

अनिलच्या फोन आला व ठरल्याप्रमाणे आम्ही दुपारी त्याच्याकडे जेवायला गेलो. तेथे आमच्या

बालमोहन शाळेतील माझी वर्ग मैत्रीण वसुमती भातखंडे, शाळेत आम्हला सिनियर असलेला क्रिकेटवीर विजय देशपांडे व त्याची पत्नी शोभा सप्रे व मी आणि वीणा होतो. अनिलच्या जेवणाचा थाट म्हणजे, राजेशाही. मद्य-पान वगैरेसह सर्व मस्त. जेवणानंतर अनिलने मला सांगितले, *"जयु, उद्या तू मला शिवाजी पार्क जिमखान्यात सकाळी ९ वाजतां भेट. संदीप परब या गृहस्थाची तुझी भेट घडवून देतो. त्याचेवर तू एक झकास सचित्र लेख लिहावा अशी माझी प्रबळ इच्छा आहे..."* अनिलने मला संदीपची मोघमपणे माहिती दिली. बाकी सर्व उद्याच्या भेटीत कळेलच असं सांगितलं.




***१) अनिल नेरुरकरच्या सुंदर घरी जेवणाचा मस्त आस्वाद घेतल्यानंतर. डावीकडून: वीणा, वसुमती भातखंडे, शोभा सप्रे व नवरा विजय-विजू देशपांडे. मागे मी व अनिल... २) शिवाजी पार्क जिमखान्यात भेलेला संदीप परब, त्याची पत्नी व मी... ३) संदीपच्या कार्यात सक्रिय भाग घेणारा अनिल जीवन आनंद संस्थेत भाषण करतांना...***

दुसऱ्या दिवशी अनिल व संदीप परब बायकोसह शिवाजी पार्क जिमखान्यात आमची वाट पाहात होते. ओळख करून दिल्यावर अनिलने त्याचा मार्ग धरला व पार्काला फेरी मारायला निघून गेला. संदीपने मला त्याच्या कार्याची संपूर्ण माहिती सांगितली. तसेच, लॅबटॉपवर व्हिडिओ, फोटो आणि प्रेस रिपोर्ट्स दाखविले तेव्ह तर मी थक्कच झालो. संदीपचं थोडक्यात कार्य असं की, त्याने स्थापन केलेल्या 'जीवन आनंद संस्थेत' मुंबईतील रस्त्यावरील होमलेस अथवा निराधार लोकांना त्यांच्या निगडित आश्रमात नेणं, त्यांना अंघोळ घालणे, स्वच्छ करणे, नवे कपडे देणे, जेवण-खाणाची व्यवस्थ करणे, रोजगारीला लावणे व त्यांची कायमची बिनशर्त दक्षता-देखभाल घेणे..!

मंडळी, संदीपचं कार्य इतकं व्यापक, Noble आणि थोर आहे की, ते मला थोडक्यात सांगता येणार नाही. आणि संदीपलाही ते विस्तृतपणे सांगायला वेळ नव्हता. कारण, त्याला भेटायला तेथे अनेकजण येत होते. तसेच, संदीपप्रमाणे मलाही वेळ नव्हता. परंतु, त्याच्या संस्थेला व कार्याला आम्ही त्वरित जाणीवपूर्वक आर्थिक मदत करून हातभार लावला होता. संदीपच्या कार्याचा उत्तम तपशील-वृत्त मी पूर्वी सप्टेम्बर २०१५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'लोकसत्ता'च्या 'सर्वकार्येषु सर्वदा' या उपक्रमातील विस्तृत लेखात वाचला होता तो सोबत देत आहे.

विचार करा अलीकडच्या काळात वृध्दाश्रमांची संख्या मोठय़ा प्रमाणात वाढली असल्याचं दिसून येतं. पण तिथे दाखल होणाऱ्या वृध्दांची मुलं किंवा जवळच्या नातेवाईकांनी त्यांना तिथे आणून ठेवलेलं असतं. आणि त्यांच्या भोजन-निवास, तसंच अन्य देखभालीसाठी दरमहा विशिष्ट शुल्क आकारलं जातं. पुण्या-मुंबईसारख्या शहरात तर उत्तम आर्थिक स्थिती असलेल्या, पण मुलं परदेशी असल्यामुळे एकाकी झालेल्या वृध्द दांपत्यांसाठी खास ‘अपार्टमेंट’ उभ्या राहिल्या आहेत. मात्र, जीवन आनंद संस्था संचालित संविता आश्रमामध्ये आलेले वृद्ध मात्र शब्दश: निराधार असतात. तसा संदीप चार-चौघांसारखाच एक साधा तरुण. वडील मुंबईत गिरणी कामगार. आई लौकिकार्थाने अशिक्षित, पण सुसंस्कृत, संवेदनशील. गिरणी कामगारांच्या संपामध्ये वडिलांची नोकरी सुटली आणि ते कुटुंबासह सिंधुदुर्ग जिल्ह्य़ातल्या आपल्या मूळ गावी परत आले. तिथेच संदीप शिकून मोठा झाला आणि कोकणातल्या तरुणांच्या शिरस्त्यानुसार पोटा-पाण्यासाठी त्याने मुंबईची वाट धरली. पण त्या मायानगरीतही आईच्या संस्कारांवर जोपासलेलं संवेदनशील मन दिलं नाही. उलट, त्या महानगरीत आधार नसलेल्या रस्त्यावरच्या मुलांमध्ये तो रमायला लागला. प्रसंगी त्यांच्याबरोबर रस्त्यावरच राहू लागला. त्यांचे प्रश्न, त्यांची सुख-दुःखं समजावून घेऊ लागला. हे करत असतानाच त्याला समाजातल्या निराधार वृध्दांची अवस्था अतिशय बिकट असल्याचं प्रत्यक्ष अनुभवातून ध्यानात आलं. मग त्याने त्यांच्यासाठी काम करण्याचा निर्णय घेतला. एक मन मुंबईत असलं तरी दुसरं मन कोकणातल्या मातीमध्ये घट्ट रुतलेलं होतं. त्यामुळे त्याने अपंग, अनाथ वृध्दांना आधार देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात अणाव इथे बबन परब या काकांसह वृध्दाश्रम सुरू केला. पहिल्या दोन-तीन वर्षांतच या निराधार वृध्दांप्रमाणेच समाजातल्या अपंग, मतिमंद, मनोरुग्ण इत्यादी घटकांचेही गुंतागुंतीचे प्रश्न त्याला सतावू लागले. मात्र त्यांच्याकडे पाठ फिरवण्यापेक्षा त्यांना थेट भिडण्याचा पर्याय या तरुणाने स्वीकारला. त्याचं नाव संदीप परब. अशा तऱ्हेचं काम करायचं म्हटल्यावर संस्थात्मक स्वरूप देणं गरजेचं होतं. त्यामुळे संदीपने संस्था स्थापन केली आणि तिचं नाव ठेवलं- ‘जीवन आनंद’..!



***१-२) चक्क रस्त्यावरील बेघर लोकांना उचलून जीवन आनंद संस्थेतील सेवा करणाऱ्या व्यक्ती... ३) त्यांच्या आश्रमात बेघरांची कायम देखभाल घेतांना...***

अणावच्या वृध्दाश्रमापाठोपाठ मुंबई-गोवा महामार्गावर कणकवलीपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या पणदूर या गावी २ ऑक्टोबर २०१३ रोजी संस्थेतर्फे 'संविता आश्रम' हे केंद्र सुरू करण्यात आलं आणि त्यानंतर गेल्या अवघ्या दोन वर्षांच्या काळात या ठिकाणी केवळ सिंधुदुर्ग नव्हे, तर रत्नागिरी, मुंबई, कोल्हापूर इथूनही निरनिराळ्या समस्यांनी ग्रासलेले ५२ निराधार वृध्द, भिन्न वयोगटाचे स्त्री-पुरुष आणि बालकं दाखल झाली आहेत. वर्गवारीच करायची तर त्यापैकी १६ वृध्द आहेत. २५ मनोरुग्ण आहेत. त्याचबरोबर ५ बालकं आणि ३ अपंगही संविताश्रमच्या आश्रयाने आपलं जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. या व्यतिरिक्त कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या तिघाजणांना शालेय-महाविद्यालयीन शिक्षणासाठी संस्थेने आधार दिला आहे. अर्थात या आकडेवारीवरून समस्येचं गांभीर्य आणि गुंतागुंत लक्षात येणार नाही. पण प्रत्यक्ष तिथे भेट देऊन या दुर्दैवी माणसांना भेटल्यावर जाणवतं की, प्रत्येकाचं जीवन म्हणजे एक स्वतंत्र शोकात्म कथा आहे आणि तरीही हिंमत न हारता, संदीपसह १५-२० कार्यकर्ते त्यांच्या जीवनात आनंद फुलवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यापैकी काही संदीप किंवा त्याच्या कार्यकर्त्यांना रस्त्याच्या कडेला असाहाय्य अवस्थेत सापडलेले, तर काहीजणांना गावातल्या कोणीतरी व्यक्तीने किंवा प्रसंगी पोलिसांनी आणून सोडलेलं. त्यामुळे त्यांचा सर्व आर्थिक भार संस्थाच उचलते. गरजेनुसार औषधोपचार किंवा शस्त्रक्रियेचा खर्च केला जातो आणि वार्धक्यामुळे मरण पावणाऱ्या 'आजी-आजोबां'वर अंत्यसंस्कार करून त्यांना सद्‌गती देण्याचीही जबाबदारी हे कार्यकर्तेच पार पाडतात. इथल्या मनोरुग्णांची अवस्था कोणत्याही मनोरुग्णालयात भेटणाऱ्या रुग्णांसारखीच असते. कोणी गुडघ्यात मान घालून बसलेलं, तर कोणी जमिनीवर लोळत असलेलं, तर कोणी मोठमोठय़ाने स्वत:शीच बडबडणारं. पण तरीही हे रुग्णालय वाटत नाही. एखादं एकाच छपराखाली राहत असलेलं मोठं एकत्र कुटुंब वाटतं. कारण इथले आशीष कांबळी, कल्पना ठुमरे, नीता गावडे, राजू यादव यांच्यासारखे कार्यकर्ते त्यांच्याशी कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावनेने बोलत-वागत असतात. प्रसंगी त्यांच्या अपशब्दांचा मार झेलत त्यांच्या बेभानपणाला आवर घालत असतात. कार्यकर्त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच काहीजणांचं भरकटलेलं आयुष्य थाऱ्यावर येतं. गरोदर असतानाच पतीचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे प्रचंड मानसिक धक्का बसलेल्या कुडाळ तालुक्यातील एका पदवीधर महिलेनं अन्न-पाणी सोडलं. पतिवियोगाने खचून जाऊन ती वेळी अवेळी उपाशीपोटी रस्त्यावर भटकू लागली. अशा परिस्थितीत तिला सावरणं जवळच्या नातेवाईकांनाही अशक्य होऊन बसलं. अखेर त्यांनी तिला संविता आश्रमामध्ये दाखल केलं. कुडाळचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रुपेश धुरी, स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. विशाखा पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकर्त्या दर्शना गवस इत्यादींनी या नाजूक काळात तिचा घरच्या मायेने सांभाळ केला. त्यामुळे पती निधनाच्या धक्क्यातून सावरत त्या महिलेने दोन गोंडस जुळ्या मुलींना जन्म दिला. आता त्यांच्यासह ती या आश्रमाची कायमची सदस्य बनली आहे. मानसिक आजारातून पूर्णपणे बरे झालेल्या पाच रुग्णांचं समाजात पुनर्वसन करण्यातही संस्थेने यश मिळवलं आहे. मात्र अशाच प्रकारे

कोल्हापूर जिल्ह्य़ातून वेडाच्या भरात भरकटलेली आणि पोलिसांनी इथे दाखल केलेली एक २३ वर्षीय तरुणी तेवढी सुदैवी नाही. तिचा मानसिक आजार आता पूर्णपणे बरा झाला आहे. तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्यातही संस्थेचे कार्यकत्रे यशस्वी झाले. पण आर्थिक दुरवस्थेमुळे तिचा सांभाळ करण्याबाबत घरच्या माणसांनी असमर्थता दाखवल्यामुळे ती संस्थेमध्येच राहिली आहे.



***१-२) जीवन आनंद संस्थेत आनंदाने थारा मिळतो अशी रस्त्यावरील बेघर लोकं... ३) संदीप परबच्या कार्याचे अनेक गौरव-सन्मान झालेत. 'लोकसत्ता'च्या 'सर्वकार्येषु सर्वदा' हा अभिमानास्पद गौरव सुप्रसिद्ध नट विक्रम गोखले यांच्याकडून स्विकारतांना संदीप परब...***

जन्मत:च व्यंग असलेल्या किंवा बालपणी दुर्धर आजाराने पछाडलेल्या मुलांमुळे त्या कुटुंबाच्या सुखाला जणू दृष्ट लागते. अशा मुलांचं हरपलेलं बाल्य पुन्हा मिळवून देण्यासाठीही संविता आश्रम कार्यरत आहे. मग तो मेंदूच्या गंभीर दुखापतीमुळे त्रस्त झालेला दुष्यंत लाड असो किंवा जिल्ह्यातील हृदयरोगग्रस्त बालकं असोत, संदीप व त्याच्या सहकाऱ्यांनी प्रसंगी पदरमोड करून त्यांच्यावरील अवघड शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांकडून यशस्वीपणे करून घेतल्या आणि असाहाय्य वेदनेतून त्यांची मुक्तता झाली. संस्थेच्या कामाचं स्वरूपच असं आहे की, इथे विविध प्रकारच्या तज्ज्ञ डॉक्टरांचं सतत सहकार्य लागतं. त्या दृष्टीने डॉ. कौस्तुभ लेले (सावंतवाडी), मुंबईच्या मानसशास्त्रज्ञ स्मिता आकळे, त्याचबरोबर सिंधुदुर्ग जिल्हा शासकीय रुग्णालयातील सर्व डॉक्टरमंडळी सेवाभावी वृत्तीने सहकार्य करत असतात. परिचारिका, पूर्णवेळ कार्यकर्ते, इतर कर्मचारी मिळून सोळाजण या संस्थेत काम करत आहेत. त्यांच्या वेतनासह संस्थेत राहणाऱ्या सर्व प्रकारच्या निराधारांचा मिळून एकूण खर्चापोटी दरमहा सुमारे तीन लाख रुपयांची गरज असते. संस्थेच्या हितचिंतकांकडून वेळोवेळी वस्तू किंवा रोख देणग्यांच्या स्वरूपात मदत केली जाते. त्यातून हा सार्वजनिक प्रपंच चालतो. पणदूरचे निवृत्त वनाधिकारी संजय सावंत यांनी भाडेतत्त्वावर दिलेल्या बंगल्यात आणि गावात संस्थेने स्वत: घेतलेल्या जागेत उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये सध्या सर्वांच्या निवासाची सोय करण्यात आली आहे. पण तिथल्या गैरसोयी लक्षात घेता

संस्थेची स्वतंत्र वास्तू उभी करण्याचं काम सुरू झालं आहे. त्यासाठी मोठय़ा प्रमाणात निधीची गरज आहे. कोणत्याही प्रकारच्या सरकारी अनुदानासाठी करावा लागणारा खटाटोप आणि कागद रंगवण्याची किचकट प्रक्रिया शक्य नसल्यामुळे जनताजनार्दनाच्या साहाय्याच्या आधारेच हे कार्य चालवण्याचा संदीप व त्याच्या सहकाऱ्यांचा निर्धार आहे.

मंडळी, एक मात्र खरं की, अनिलने मला संदीपची ओळख करून दिली नसती तर मी एका नि:स्वार्थीपणे समाजकार्य करणाऱ्या एका थोर, प्रसिध्दी विन्मुख व महान व्यक्तीला मुकलो असतो. पूर्वी मीना नेरुरकर मला म्हणाली होती ते अगदी खरं आहे. अनिलला भरपूर माणसं लागतात. म्हणून तो सारखा मुंबईत असतो. मात्र, स्वतः समाजकार्य करून अनिलने या संदीप परबच्या कार्याला लाखो रुपयांची मदत केली आणि करीत आहे. हा अनिलचा मोठेपणा आहे.

**टीप:** हा लेख वाचून जर आपल्यालाही संदीपच्या कार्याला थोडाफार आर्थिक हातभार लावावासा वाटला तर जरूर संदीपला या फोनवर Cell: 98202 32765 संपर्क करावा.
अथवा येथे ई-मेलवर jeevanaanandsanstha@gmail.com संपर्क करावा. धन्यवाद.

(क्रमशः)

**- जयंत कुळकर्णी**